MHRG080004742019 **नि.दि.दावा क्र.४१/२०१९**

श्रीमती. शंवता हिरु पाताडे
वि.
श्री.केशव रामा निकम व इतर

## नियमीत दिवाणी दावा क्र.४१/२०१९ मधील
## निशाणी क्र.५ खालील आदेश

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र. १ ने, दावा मिळकतीतील तिच्या ताब्यास आणि वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये, तसेच दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकावर कोणत्याही स्वरुपात फेरबदल करु नये आणि दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाईचा हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

### वादीचे थोडक्यात अभिकथन खालीलप्रमाणे–

०२. वादीचे दाव्यामध्ये असे कथन आहे की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती या तिचे वडील रामा नावजी निकम यांच्या मालकीच्या होत्या. तिच्या वडीलांच्या व आईच्या मृत्युपश्चात त्या मिळकती तिला वारसा हक्काने प्राप्त झालेल्या आहेत. त्याप्रमाणे तिचा दावा मिळकतींमध्ये मालकी हक्काने ताबा व वहिवाट आहे. वादीचे वडील रामा नावजी निकम यांचा सन १९८३ साली मृत्यु झाला आहे. तिच्या वडीलांना ती मुलगी म्हणुन एकच अपत्य आहे. तिच्या वडीलांच्या मृत्युनंतर, प्रतिवादी क्र. १ ने वादीच्या आईचा व वादीच्या अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेऊन, फेरफार क्र. १०३२ अन्वये स्वत: च्या नावाची नोंद मुलगा म्हणुन बेकायदेशीरपणे दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखास लावलेली आहे.

०३. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ हा तिचा सख्खा भाऊ नाही व त्याचा तिच्या वडीलांशी अथवा आईशी कोणताही नातेसंबंध नाही. असे असताना प्रतिवादी क्र १ व २ यांनी वादीच्या अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेऊन दिनांक २३/०१/२०१९ रोजी दोन हक्कसोडपत्राचे दस्त बेकायदेशीरपणे फसवणुक करुन

निष्पादित करुन घेतलेले आहेत. त्याची माहिती वादीच्या मुलास झाल्यानंतर त्याने त्वरीत गावकामगार तलाठी यांच्याकडे हरकत घेतलेली आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तिची फसवणुक करुन सदरचे दोन्ही दस्त निष्पादित करुन घेतलेले आहेत.

०४. त्यापुढे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ हा स्वत:च्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखास झालेली असल्याचा गैरफायदा घेऊन दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करित आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा, दावा मिळकती तिला वारसा हक्काने प्राप्त झाल्याचे, प्रतिवादी क्र. १ हा तिचे वडील रामा निकम यांचा पुत्र नसल्याचे व दिनांक २३/०१/२०१९ रोजीचे हक्कसोडपत्राचे दस्त बेकायदेशीर असल्याचे ठरवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दावा प्रलंबित असताना, प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीतील तिच्या ताब्यास व वहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये, दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखात फेरबदल करु नये आणि दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे.

## प्रतिवादींचे थोडक्यात प्रतिकथन खालीलप्रमाणे–

०५. त्याउलट, प्रतिवादी क्र. १ ने निशाणी क्र.१७ अन्वये अर्जास म्हणणे व दाव्यास कैफियत दाखल करुन ते आव्हानित केलेले आहेत. त्याचे असे कथन आहे की, वादीचे वडील रामा नावजी निकम आणि त्यांची पत्नी येणुबाई रामा निकम यांनी प्रचलित रिती-रिवाजाप्रमाणे त्याला सन १९५५ साली कायदेशीरपणे मुलगा म्हणुन दत्तक घेतलेले आहे. त्याप्रमाणे शाळेमध्ये प्रवेश घेताना त्याच्या दत्तक वडीलांचे म्हणजेच रामा निकम यांच्या नावाची नोंद दाखल्यावर करण्यात आलेली आहे.

०६. त्याचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकती या रामा नावजी निकम याच्या ताब्यात कुळ हक्काने होत्या. त्याप्रमाणे दिनांक १५/१२/२००३ रोजी ३२ग ची प्रक्रिया होऊन, मयत रामा नावजी निकम यांना मालक ठरविण्यात आलेले आहे. ती

खरेदीची रक्कम त्याने स्वत: भरलेली आहे. सर्व महसुल अभिलेखामध्ये प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद ब-याच पुर्वी झालेल्या आहेत. परंतु वादीने त्या नोंदीबाबत कोणतीही हरकत घेतलेली नव्हती व नाही. त्याने त्याचे दत्तक वडील रामा नावजी निकम आणि आई येणुबाई रामा निकम यांच्या मृत्यूवेळी आवश्यक असणारे सर्व विधी दत्तक पुत्र म्हणुन पार पाडलेले आहेत. सबब त्याने तो मयत रामा निकम आणि येणुबाई निकम यांचा दत्तक पुत्र असल्याचे कथन केलेले आहे.

०७. प्रतिवादी क्र. १ चे पुढे असे कथन आहे की, वादीने तिच्या मुक्त संमतीने दिनांक २३/०१/२०१९ रोजी दावा मिळकती संदर्भातील दोन्ही हक्कसोडपत्रे निष्पादित करुन दिलेली आहेत. त्याने व इतर प्रतिवादींनी, वादीची कोणत्याही प्रकारे फसवणुक केलेली नव्हती व नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, वादीने निष्पादित करुन दिलेले दोन्ही हक्कसोडपत्राचे दस्त हे कायदेशीर आहेत. सबब प्रतिवादी क्र. १ ने वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

०८. उभय पक्षांची परस्पर विरोधी कथने लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निश्चितीकरणासाठी उपस्थीत होत आहेत. त्यावरील निष्कर्ष मी अनुमान काढून कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| २. | वादीने न्यायाचा समतोल तिच्या बाजूने असल्याचे सिध्द केले आहे काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| ३. | वादीने मनाई हुकूम नाकारल्यास तिचे अपरिमीत नुकसान होईल असे सिध्द केले आहे काय ? | **अंशत: होकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

०९. उभय पक्षकारांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठ्यार्थ बरीचशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांचा उल्लेख मी कारणमिमांसेमध्ये करीत आहे. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

### मुद्दे क्र.१ ते ३ करीताः–

१०. मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने, कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदरचे मुद्दे मी एकत्रीत चर्चेस घेतलेले आहेत. दावा मिळकती या मयत रामा नावजी निकम याच्या ताब्यात व वहिवाटीत कुळहक्काने होत्या, ही बाब उभयपक्षकारांमध्ये वादांकीत नाही. तसेच वादी ही मयत रामा नावजी निकम याची मुलगी असल्याबाबत देखील उभयपक्षकारामंध्ये वाद नाही. परंतु प्रतिवादी क्र. १ हा मयत रामा नावजी निकम यांचा दत्तक पुत्र आहे किंवा काय या बाबत उभयपक्षकारांमध्ये वाद आहे.

११. वादीच्या कथनानुसार, तिचे वडील मयत रामा निकम आणि आई येणुबाई निकम यांना ती एकटीच मुलगी म्हणुन वारसदार आहे. प्रतिवादी क्र. १ याला तिच्या आई-वडीलांनी कधीही दत्तक घेतलेले नव्हते. प्रतिवादी क्र. १ ने, वादी व तिच्या आईच्या अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेऊन, दावा मिळकतीला स्वत:च्या नावाची नोंद वारस मुलगा म्हणुन केलेली आहे. त्यापुढे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ ने त्यानंतर तिची फसवणुक करुन दिनांक २३/०१/२०१९ रोजी दोन हक्कसोडपत्राचे दस्त निष्पादित करुन घेतलेले आहेत. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र. १ हा तिचा भाऊ नसल्यामुळे व दोन्ही हककसोडपत्राचे दस्त बेकायदेशीर असल्यामुळे, त्याला दावा मिळकतींमध्ये कोणतेही हक्क व अधिकार प्राप्त होत नाही.

१२. त्याउलट प्रतिवादी क्र. १ चे असे कथन आहे की, तो मयत रामा नावजी निकम आणि येणुबाई रामा निकम यांचा दत्तक पुत्र आहे. त्यामुळे त्याचा दावा मिळकतीमध्ये दत्तक मुलगा म्हणुन हक्क व अधिकार आहे. त्याची दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखास असलेली नोंद, वादीने यापुर्वी कधीही आव्हानीत केलेली नव्हती

अथवा हरकतही घेतलेली नव्हती. तिला तो तिचा दत्तक भाऊ असल्याचे माहित होते व त्याप्रमाणे तिने दोन्ही हक्कसोडपत्राचे दस्त निष्पादित करुन दिलेले आहेत.

१३. वादी ही मयत रामा नावजी निकम यांची मुलगी असल्याची बाब वादांकीत नाही. त्यामुळे रामा निकम यांच्या मृत्युनंतर तिचा दावा मिळकतीमध्ये निश्चितच वारसा हक्क निर्माण झालेला आहे. परंतु वादांकीत बाब ही आहे की, प्रतिवादी क्र. १ हा रामा निकम आणि येणुबाई निकम यांचा दत्तक पुत्र आहे का ? त्याअनुषंगाने मी अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ ने कैफियतमध्ये त्याला सन १९५५ साली दत्तक घेण्यात आल्याचे कथन केले आहे. त्याउलट स्वत: प्रतिवादी क्र. १ ने दिनांक २२/०४/२०१७ रोजी वादीच्या विधीज्ञांच्या नोटीसीला उत्तर पाठविलेले आहे, त्यामध्ये त्याला सन १९६० साली दत्तक घेतले होते असे कथन केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ याला स्वत:लाच, त्याला निश्चीत कोणत्या साली दत्तक घेण्यात आले हे सांगता येत नाही हे स्पष्ट होते. तसेच जर त्याला सन १९६० साली दत्तक घेतले असेल, तर त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर, सन १९५९ साली त्याचे वडील म्हणुन रामा निकम यांच्या नावाची नोंद कशाच्या आधारावर करण्यात आली याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ याला मयत रामा नावजी निकम व येणुबाई रामा निकम यांनी कायदेशीरपणे दत्तक घेतले आहे किंवा कसे हा मुद्दा संपरिक्षेचा मुद्दा आहे. प्रतिवादी क्र. १ ने, त्याला मयत रामा निकम व येणुबाई निकम यांनी कधी दत्तक घेतले याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही.

१४. त्यापुढे, वादीने दावा मिळकतीसंदर्भात निष्पादित करण्यात आलेली, दोन्ही हक्कसोडपत्रे आव्हानीत केलेली आहेत. ती हक्कसोडपत्रे दिनांक २३/०१/२०१९ रोजी निष्पादित करण्यात आलेली आहेत. ती हक्कसोडपत्रे निष्पादित झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीतच त्याला प्रस्तुत दाव्याद्वारे आव्हान देण्यात आलेले आहे. वादीने, ते दस्त मुक्तसंमतीने करुन दिलेले आहेत किंवा नाही हा पुराव्याचा भाग आहे. परंतु, वादीने, प्रतिवादी क्र. १ हा मयत रामा नावजी निकम व येणुबाई रामा निकम यांचा दत्तक पुत्र आहे या गोष्टीवर प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. तसेच स्वत: प्रतिवादी क्र. १ ने त्याला दत्तक घेतलेल्या तारखेबाबत परस्पर विरोधी कथने केलेली

आहेत. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे तो मयत रावजी निकम व येणुबाई निकम यांचा दत्तक पुत्र असल्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सबब, वादीने प्रथमदर्शनी दावा तिच्या बाजुने असल्याचे सिद्ध केले आहे असेच म्हणावे लागेल.

१५. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीतील तिच्या ताब्यास हरकत अथवा अडथळा करु नये अश्या स्वरुपाच्या तुर्तातुर्त मनाई हुकुमाची दाद मागितलेली आहे. परंतु त्यासाठी प्रथमत: वादीने सर्व दावा मिळकती तिच्याच ताब्यात व वहिवाटीत असल्याचे सिद्ध करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ च्या नावाची नोंद वादीसोबतच दावा मिळकतीच्या महसुल अभिलेखास ब-याच पुर्वीपासुन असल्याचे दिसते. तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ ची दावा मिळकतीमध्ये सामाईक वहिवाट असल्याचे देखील अधिकार अभिलेखावरुन दिसते. त्याशिवाय दावा मिळकतीमध्ये वादीच्या एकटीचा ताबा अथवा वहिवाट आहे असा दाखविणारा प्रथमदर्शनी कोणताही पुरावा वादीने सादर केलेला नाही. त्यामुळे वादीच्या एकटीची दावा मिळकतीमध्ये ताबा अथवा वहिवाट असल्याचे ती प्रथमदर्शनी सिद्ध करु शकलेली नाही. सबब वादीने त्याबाबत केलेली तुर्तातुर्त मनाई हुकुमाची दाद मिळण्यास ती पात्र राहत नाही.

१६. त्यापुढे वादीने दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखात प्रतिवादी क्र. १ ने कोणताही फेरबदल करु नये अशा स्वरुपाची देखील तुर्तातुर्त मनाई हुकुमाची मागणी केलेली आहे. महसुल अभिलेखातील नोंदी करण्याचा अधिकारी हा महसुल न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील असल्यामुळे, त्याबाबतचा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश देखील देता येणार नाही. सबब, वादीने त्याबाबत केलेली तुर्तातुर्त मनाई हूकुमाची दाद मिळण्यास ती पात्र राहत नाही.

१७. त्याशिवाय, वादीने प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करु नये अशा स्वरुपाची देखील तुर्तातुर्त मनाई हुकुमाची दाद मागितलेली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे, वादीने, प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र. १ हा तिच्या वडीलांचा दत्तक पुत्र असल्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ने

दावा मिळकतीची विक्री अथवा हस्तांतरण केल्यास, दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होऊ शकते. त्यामुळे, त्याबाबत तुर्तातुर्त मनाई हुकुम देणे आवश्यक असल्याचे दिसत आहे. तुर्तातुर्त मनाईचा हुकुम नाकारल्यास आणि त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतींमध्ये ति-हाईत इसमांचे हक्क निर्माण केल्यास, दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होऊन दाव्याचा मुख्य हेतु संपुष्टात येईल. तसेच वादीचे देखील अपिरिमीत असे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्याउलट प्रतिवादी क्र. १ चे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे, मी मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष " अंशत: होकारार्थी" नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीताः–**

**१८.** मुद्दे क्र. १ ते ३ मध्ये केलेल्या सविस्तर कारणमीमांसेच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः-

**–:आदेश:–**

| | |
|---|---|
| **०१.** | वादीचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज (निशाणी क्र.५) अंशत: मंजूर करण्यात येतो. |
| **०२.** | प्रतिवादी क्र. १ ने दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकतीमध्ये ति-हाईत इसमांचे हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश करण्यात येत आहे. |
| **०३.** | अर्जाच्या खर्चाबाबत आदेश दाव्याच्या अंतिम सुनावणीच्यावेळी करण्यात येईल. |

**(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)**

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.11.08 11:12:47 +0530

**(पी.एम.माने)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खालापूर.

दिनांक :- ०५/११/२०२२.
खालापूर.